# लोकनिवड दृष्टिकोन

**प्रा.डॉ. केशव दत्तराव तिडके**
लोकप्रशासन विभाग प्रमुख,
जनविकास महाविद्यालय,बनसारोळा
ता.केज जि.बीड

**प्रस्तावना :**

लोकनिवड दृष्टिकोनामुळे लोकप्रशासनाच्या निर्णय प्रक्रियेत कार्यक्षमता आणि पारदर्शकता येत आहे.नागरिकांच्या इच्छा आणि अभिरूचीचा सर्वांगीण विचार करून प्रशासनाने विविध संस्थांच्या माध्यमातुन विविध सेवा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. सार्वजनिक सेवामध्ये प्रामुख्याने नागरिकांच्या निवडीला प्राधान्य देण्यात यावे. त्यांच्या विचाराचा आदर करावा हा मुळ हेतु लोकनिवड दृष्टिकोनाचा आहे.सार्वजनिक क्षेत्रातील सेवासुविधा पुरविण्याची सर्व मक्तेदारी या दृष्टिकोनाने मोडीत काढलेली आहे. व्हिन्सेंट ऑस्ट्रॉम हे लोकनिवड दृष्टिकोन विचार प्रणालीचे प्रमुख समर्थक आहेत. मुळातच हा दृष्टिकोन पारंपारिक नौकरशाही पध्दतीला अमान्य करतो. लोकसेवा आणि जनसुविधांना प्राधान्य देतो. लोकप्रशानाने अमलात आणलेल्या विविध सुविधांमध्ये पसंत नापसंत दर्शिवणीचा संपूर्ण अधिकार नागरिकांना असतो. लोकनिवड दृष्टिकोनाने लोकशाही व्यवस्थापनातील सार्वजनिक स्वारस्थ दृष्टिकोनाला अव्हान दिलेले आहे. नोकरशाहीच्या माध्यमातून घेतलेले निर्णय हे जनकल्याणासाठी घेतले जात असतात असे म्हटले जाते. परंतु लोकनिवड दृष्टिकोनानुसार नोकरशाही अकार्यक्षम आणि संवेदनशुन्य आहे. त्यामुळे कोणतेही कार्य तत्पर होत नाही. लोकांच्या निवडीकडे दुर्लक्ष केले जाते. लोकनिवड दृष्टिकोनाचा निर्देश हा लोकप्रशानातील अविष्कार म्हणून करण्यात येतो. हा दृष्टिकोन लोकप्रशासनाच्या अध्ययनकाळातील महत्वाचा केंद्रबिंदू आहे. साधारणत: १९६० नंतर लोकनिवड दृष्टिकोनाचा प्रवेश लोकप्रशान अध्ययन प्रक्रियेत झाला आहे.

कल्याणकारी राज्याची संकल्पना स्विकारल्यानंतर नागरिकांच्या कल्याणकारी सेवा सुविधा निर्मान करण्यात आल्या. या सुविधा नागरिकांना उपलब्ध व्हाव्यात यासाठी नोकरशाहीला प्राधान्य दिले. यातुन एकाधिकारशाहीला अतिरिक्त महत्व प्राप्त झाले.लोकप्रशासनातील सिध्दांत आणि व्यवहार यामध्ये मोठी तफावत निर्मान झाली.शासन आणि प्रशासन याविषयी सामानय नागरिकांमध्ये अविश्वासाची भावना निर्मान झालेली आहे. आजच्या व्यापारीकृत संरचनेत व्यक्तीच्या आवडीला प्राधान्य दिल्यामुळे उत्पादनात तसा बदल करण्यात येतो.

**व्याख्या :-**

१) डेनिस मुलर : "गैरबाजार निर्णयांचा आर्थिक अभ्यास किंवा अर्थशास्त्राचे राज्यशास्त्रातील सुलभ उपयोजन म्हणून

१) डेनिस मुलर : "गैरबाजार निर्णयांचा आर्थिक अभ्यास किंवा अर्थशास्त्राचे राज्यशास्त्रातील सुलभ उपयोजन म्हणून लोकनिवड दृष्टिकोनाकडे पाहिले जाते."

२) मोहित भट्टाचार्य : "लोकनिवड दृष्टीकोन हा मुख्यत: लोकप्रशानातील नोकरशाही प्रारूपाशी संबंधीत आहे. जो सार्वजनिक सेवांच्या वितरणामध्ये बहुपर्यायी निवडीशी संबंधीत आहे."

**उद्दिष्टये :**

१) लोकनिवड दृष्टिकोन सिद्धांताचा अभ्यास करणे.

२) लोकनिवड दृष्टिकोन अंमलबजावणीत लोकप्रशासनाची भुमिका अभ्यासणे.

३) लोकनिवड दृष्टिकोनाच्या अनुशंगाने नौकरशाहीत झालेल्या परिवर्तनाचा आढावा घेणे.

४) लोकनिवड दृष्टीकोनामुळे प्रशासकीय सेवा बाबत मिळणाऱ्या तत्पर सुविधांचा अभ्यास करणे.

**गृहितकृत्ये :-**

१) लोकनिवड दृष्टिकोनामुळे जनसुविधांना प्राधान्य दिले जात आहे.

२) सार्वजनिक सेवांच्या वितरणामध्ये जनतेला पर्याय निवडीसाठी हा दुष्टिकोन महत्वाचा ठरत आहे.

३) लोकनिवड दृष्टिकोन हा लोकशाही तत्वावर आधारलेला आहे.

४) लोकनिवड दृष्टिकोनामुळे विकास प्रक्रियेतील जनसहभाग वाढत आहे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत शाधनिबंधासाठी दुय्यम स्त्रोताचा वापर करून तथ्य संकलन करण्यात आलेले आहे.संदर्भ ग्रंथाचा आवश्यक्तेनुसार आधार घेतलेला आहे.

**लोकनिवड दृष्टीकोनाची वैशिष्टये :-**

१) लोकनिवड दृष्टिकोनाच्या विचारप्रणालीने नोकरशाहीवर प्रखर असा हल्ला केलेला आहे. लोकशाही व्यवस्थेमध्ये चालविली जाणारी कार्यप्रणाली आणि यातुन निर्मान होणारे दोषपुर्ण कार्य यावर या दृष्टिकोनाने हल्ला केलेला आहे. नोकरशाही व्यवस्थेतील सनदी सेवक हे कोणताही निर्णय जनहितासंबंधी घेतात.जनकल्याणाला प्राधान्य देतात असे म्हटले जाते. परंतु यामध्ये फारसे तथ्य दिसून येत नाही. नोकरशाही ही जनहितासंबंधी नेहमीच उदासिन भूमीका पार पाडते.

२) बाजारपेठेतील व्यवहार आणि बाजारपेठेतील कार्यरत असणारी यंत्रणा याबाबत काहीच माहित नसतांना निर्णय घेतले जातात. यामुळे जनहिताकडे दुर्लक्ष केले जाते.समाजकार्य करण्यात नोकरशाही ही असमर्थ ठरत आहे.

३) नोकरशाहीच्या चुकीच्या संकल्पनेमुळे नोकरशाहीला अतिरीक्त महत्व प्राप्त झाले आहे. मोठया प्रमाणावर नोकरशाहीला अधिकार दिले गेले. नोकरशाहीने स्वत:चे महत्व वाढविण्यासाठी जाणीवपुर्वक प्रयत्न केले आहेत परंतु आधुनिक काळातील समाजातील नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी ती असमर्थ ठरलेली आहे. त्यामुळे नोकरशाहीचे अधिकार कमी करणे गरजेचे आहे.

४) शासकीय कामाचा वाढता व्याप कमी करून काही कामे खाजगीक्षेत्राकडे दिले पाहिजे असे लोकनिवड दृष्टिकोनाच्या विचारसरणीचे मत आहे.वाढत्या कार्यामुळे नौकरशाहीकडे अतिरीक्त अधिकार जातात. त्यामुळे सत्तेचे केंद्रीकरण होते. यामुळे नोकरशाही ही प्रभावशाली बनते म्हणून शासकीय स्तरावरील कार्य कमी करून नोकरशाहीचे महत्व कमी केले पाहिजे. विशेषत: आर्थिक स्वरूपाची कामे खाजगी क्षेत्राकडे सोपवून द्यावीत. ज्यामुळे कामे चांगल्या पध्दतीने पार पडतील व जनहित साध्य होईल.

५) खाजगीक्षेत्र व प्रशासकीय क्षेत्र यांच्यात कामकाजाबाबत स्पर्धा निर्मान केली पाहिजे. सार्वजनिक सेवा पुरवितांना व अंमलबजावणी करतांना स्पर्धेच्या माध्यमातुन पारदर्शक सुविधा नागरिकांना प्राप्त होतील स्पर्धात्मक बाजारपेठेची नितांत गरज आहे. लोकप्रशानात स्पर्धेचे वातावरण करण्याची महत्वाची गरज आहे. असे लोकनिवड दृष्टिकोनाचे पुरस्कर्ते मानतात.

६) लोकनिवड दृष्टिकोन हा लोकशाही तत्वावर आधारलेला असल्यामुळे बाजारपेठेतील ग्राहकांच्या आवडी निवडीला प्राधान्य देतो.

७) सार्वजनिक क्षेत्रातील कामकाजात निर्मान झालेले दोष दूर करण्यासाठी प्रामुख्याने प्रशासकीय अधिकाराचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे. विकेंद्रीकरणाच्या माध्यमातून लोकांच्या निवडीला प्राधान्य देण्यात येईल.

८) प्रशासकीय कार्यप्रणाली आणि निर्णय प्रक्रियेत जनतेला सहभागी करून घेतले पाहिजे. जनसहभाग हा लोकनिवड दृष्टिकोनाचे महत्वाचे तत्व आहे.

**लोकनिवड विचारसरणीचे तत्वे :-**

- सार्वजनिक क्षेत्रामध्ये कार्य करणारे नोकरशाहीतील अधिकारी कर्मचारी हे खऱ्या अर्थाने जनसेवक बनले पाहिजे. जनकल्याण करतांना त्यांनी लोकांच्या निवडीला प्राधान्य दिले पाहिजे.
- नोकरशाही व्यवस्थेने आपली विकासाची भूमीका पार पाडतांना जनतेच्या इच्छा-आकांक्षा पूर्ण करण्याकरीता लोकभावनांचा प्रथमत:विचार करावा.
- नोकरशाहीतील प्रत्येक सेवकाने खाजगीक्षेत्रातील कार्यप्रणाली बरोबर स्पर्धात्मक दृष्टिकोन स्विकारावा त्यातून कार्याची अंमलबजावणी करावी.
- जनकल्याणासाठी तयार करण्यात आलेले विकास धोरण आणि त्या धोरणाची करण्यात येणारी अंमलबजावणी यामध्ये खुलेपणा असला पाहिजे.
- नोकरशाहीने बदलत्या काळानुसार आपल्या कार्यपद्धतीत बदल करून सुधारणा करावी.

**सारांश :-**

लोकप्रशासनातील धोरण निर्मिती बाबतचा लोका निवड दृष्टिकोन हा महत्वाचा आहे. बाजार मुल्याशी निगडीत हा दृष्टिकोन आहे. ग्राहक हा बाजारपेठेतील पाहिजे ती वस्तु निवडू शकतो. विकेद्रीकरणाला यामुळे चालना मिळते. लोकनिवड विचारधारा ही ग्राहकांचे समाधान याला प्राधान्य देऊन नागरिकांना एक प्रकारचे सेवा निवडीचे स्वातंत्र्य बहाल करते. लोकनिवड दृष्टिकोनाच्या माध्यमातून लोकप्रशानामध्ये एक वैकल्पीक प्रतिमान प्रस्तुत करतात. बहुसंख्य निर्णयामध्ये विकेंद्रीकरणाचा पुरस्कार करतात.नोकरशाहीऐवजी लोकशाही प्रशासन व्यवस्थेला प्राधान्य दिले आहे.लोकशाहीमध्ये नागरिकांना स्वातंत्र्याचा अधिकार अनेक पर्यायामधुन एका पर्यायाची निवड करण्याचे स्वातंत्र्य असते. नोकरशाही ही बांधील जरी असली तरीही ती उत्पादक कार्यासाठी आणि परस्पर लोक सेवा पुरविण्यासाठी अपर्याप्त असते.त्यांच्यात विभिन्न कार्य करण्यास फारशी क्षमता नसते. त्यामूळे विविध सार्वजनिक संस्थांच्या माध्यमातून सेवा पुरविल्या पाहिजेत. नागरिकांना आपल्या पसंतीच्या संस्थेची निवड करण्याचे लोकशाही स्वातंत्र्य खऱ्या अर्थाने प्राप्त होईल.

**संदर्भसूची : -**

१) प्रा. नंदकुमार नाईक सैद्धांतीक लोकप्रशासन एज्यूकेशनल पब्लिशर्स औरंगाबाद २०१६ पृ.१२३
२) मोहित भट्टाचार्य लोकप्रशासन के नये आयाम जवाहर पब्लिशर्स, दिल्ली २०१० पृ.४३२
३) डॉ.बोरा, डॉ.सिरसाठ, लोकप्रशासनशास्त्र , विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद २०१३ पृ.४२०
४) प्रा.व्ही.बी.पाटील, समग्र लोकप्रशासन, के सागर पब्लिकेशन पुणे २००६ पृ.६१
५) योजना, २०१६ पृ.१३